खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०६ | अंक : २४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०७ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## नागपूरला जलसंकटाचा धोका! यंदा सरासरीच्या ६१.८ टक्केच पाऊस



**अक्षराज : वृत्तसंकलन**

दि.०६, नागपूर : जिल्ह्यात यंदा पावसाने दडी मारल्याने धरणांतील जलसाठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत सरासरीच्या १०५ टक्के पाऊस झाला होता; यंदा मात्र केवळ ६१.८ टक्के पाऊस नोंदवला गेला. परिणामी जिल्ह्यातील धरणांमध्ये गेल्यावर्षीच्या तुलनेत सुमारे ३० टक्के कमी जलसाठा आहे. पिण्याच्या पाण्यासह रब्बी हंगामातील पिकांनाही याचा फटका बसू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

पूर्व विदर्भातील इतर जिल्ह्यांत पावसाने चांगली हजेरी लावली असली तरी नागपूर जिल्ह्यात पाऊस कमी पडला. पेंच पाटबंधारे विभाग अंतर्गत येणाऱ्या तोतलाडोह, नवेगाव खैरी आणि खिंडसी या प्रकल्पांमध्ये गेल्यावर्षी याच काळात सुमारे ९० टक्के जलसाठा होता. यंदा तो केवळ ६० टक्क्यांच्या आसपास आहे. पाटबंधारे विभाग दक्षिण अंतर्गत मध्यम प्रकल्पांमध्ये गेल्यावर्षी ९५ टक्के जलसाठा होता; यंदा तो ५५ टक्क्यांवर आला आहे. लघु सिंचन प्रकल्पांमध्ये गेल्यावर्षी ९३ टक्के जलसाठा होता, यंदा ७२ टक्के आहे. जिल्ह्यातील सर्व धरणांचा विचार करता गेल्यावर्षी ९१.११ टक्के जलसाठा होता; यंदा तो ५९.४१ टक्के आहे.

**रब्बीचे पीक अडचणीत !**

सध्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर नसला तरी रब्बी हंगामावर मोठा परिणाम होऊ शकतो, असा इशारा कृषी विभागातील तज्ज्ञांनी दिला. विहिरींनाही पाणी नसल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे आहे. सोयाबीनसाठी शेवटचा पाऊस महत्त्वाचा असतो. पाऊस आला नाही तर दाणे भरले जाणार नाहीत आणि उत्पादन घटू शकते. कापूस आणि तुरीच्या उत्पादनातही घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी सिंचन विभाग आधीपासून राखीव साठा ठेवतो. पुढील वर्षीही पाण्याचे संकट निर्माण होऊ नये, यासाठी हा साठा जपावा लागतो. मात्र, यापुढेही पाऊस झाला नाही तर कॅरीओव्हरचे पाणी वापरावे लागू शकते, असे सिंचन विभागाकडून सांगण्यात आले. यावर्षी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असली तरी महापालिकेने गळती रोखणे आणि नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

## दिल्लीत हाहाकार, पाच मजली इमारत कोसळली, अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

दि.०६, नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्लीतून दुर्दैवी घटना समोर येत आहे. दिल्लीत पाच मजली इमारत कोसळली आहे. या दुर्घटनेत काही विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकल्याची शंका व्यक्त केली जात आहे. संबंधित घटना ही दक्षिण दिल्लीतील मोती बाग परिसराजवळ असणाऱ्या सत्य निकेतन येथे घडली आहे. ही इमारत अचानक पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली आहे. यावेळी परिसरात प्रचंड मोठी खळबळ उडाली. घटनास्थळी बचाव पथक दाखल झालं आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनीदेखील या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्लयांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न केले जात असल्याची माहिती मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिली आहे.

संबंधित घटना ही दुपारी सव्वा एक ते दीड वाजेच्या सुमारास घडली आहे. अग्निशामक दलाला दुपारी १ वाजून ३३ मिनिटांनी या घटनेची माहिती मिळाली होती. यानंतर बचाव पथकाच्या १२ गाड्या घटनास्थळी पाचरण करण्यात आल्या. सध्या मलबा हटवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे.



**इमारतीत किती जण राहत होते?**

दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण कॅम्पसच्या परिसरात सत्य निकेतन हा परिसर आहे. या परिसरात विद्यार्थी मोठ्या संख्येत वास्तव्यास आहेत. त्यामुळे संबंधित इमारतीत विद्यार्थी वास्तव्यास होते, अशी माहिती समोर येत आहे. विविध माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित इमारतीत विद्यार्थ्यांचे हॉस्टेल होते. तिथे विद्यार्थी पीजी म्हणून देखील राहत होते, अशीदेखील माहिती समोर येत आहे. जवळपास २० ते ३० विद्यार्थी इमारतीत वास्तव्यास होते, अशी माहिती समोर येत आहे. अर्थात याबाबत अधिकृत माहिती लवकरच समोर येईल.

दरम्यान, या विद्यार्थ्यांची नावे अद्याप समजू शकलेली नाहीत. तसेच ढिगाऱ्याखाली कोण अडकलं आहे आणि आतापर्यंत ढिगाऱ्याखालून कुणाला सुरक्षित काढण्यात आलं आहे का? याची माहिती अद्याप समजू शकलेलं नाही. सध्या बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. पण या घटनेमुळे परिसरात हाहा:कार उडाला आहे. स्थानिक नागरिक भयभीत झाले आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेले विद्यार्थी सुरक्षित राहावते आणि त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यावे, अशी प्रार्थना केली जात आहे.

**मुख्यमंत्री रेखा गुप्ता काय म्हणाल्या?**

या घटनेवर दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या घटनेवर चिंता व्यक्त केली. तसेच घटनास्थळी एनडीआरएफ, डीडीएमए, दिल्ली फायर सर्व्हिस, दिल्ली पोलीस, एमसीडी, सीएटीएस आणि सिव्हील डिफेन्स अशा विविध यंत्रणांच्या टीम बचावकार्यासाठी दखल झाल्या आहेत. त्यांच्याकडून बचावकार्य केले जात आहे. घटनेनंतर परिसरातील इतर इमारतींदेखील खाली करण्यात आल्या आहेत. मलब्याखाली अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याचे आणि प्रभावित कुटुंबांना तात्काळ मदतीसाठी शक्यतो सर्व प्रकारचे प्रयत्न केले जात आहे. बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. नागरिकांची सुरक्षा ही प्राथमिक जबाबदारी आहे, असं रेखा गुप्ता म्हणाल्या आहेत.

## पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवाला गालबोट! ६ ते ७ जणांना विजेचा धक्का

**अक्षराज : अभिनव येलवे**



दि.०६, पनवेल (नवी मुंबई) : पनवेल शहरातील लाईन आळी, शिवसेना शाखेजवळ सुरू असलेल्या दहीहंडी उत्सवादरम्यान धक्कादायक घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. उत्सवादरम्यान अचानक विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने अंदाजे ६ ते ७ जणांना विजेचा शॉक बसल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर उत्सवस्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

दहीहंडी उत्सवात मोठ्या संख्येने नागरिक, गोविंदा पथके तसेच लहान मुले सहभागी होत असतात. त्यामुळे अशा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये विद्युत सुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि विशेषतः बालसुरक्षा अत्यंत महत्त्वाची ठरते. मात्र, या घटनेमुळे उत्सवस्थळी करण्यात आलेल्या सुरक्षा उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**विद्युत सुरक्षेची तपासणी झाली होती का?**

उत्सवाच्या ठिकाणी विद्युत जोडण्या, तात्पुरते वायरिंग, स्टेज, ध्वनिक्षेपक, रोषणाई आणि इतर विद्युत उपकरणांची योग्य प्रकारे तपासणी करण्यात आली होती का? वायरिंग सुरक्षित पद्धतीने करण्यात आले होते का? विद्युत तारांना नागरिकांचा किंवा मुलांचा संपर्क होणार नाही, यासाठी पुरेशी खबरदारी घेण्यात आली होती का, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

**मुलांच्या सुरक्षेचे काय?**

दहीहंडीच्या कार्यक्रमांमध्ये अनेक पालक आपल्या लहान मुलांसह सहभागी होतात. गर्दीत मुले हरवण्याची शक्यता, विजेच्या तारांचा संपर्क, स्टेज किंवा मंडपाजवळील धोकादायक उपकरणे, वाहनांची ये-जा तसेच गर्दीमध्ये चेंगराचेंगरीचा धोका लक्षात घेऊन बालसुरक्षेसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती का? हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

मुलांना विद्युत उपकरणे, जनरेटर, तात्पुरते वायरिंग किंवा दहीहंडीच्या संरचनेपासून सुरक्षित अंतरावर ठेवण्यासाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

**आपत्कालीन व्यवस्थेची तयारी किंतपत?**

अशा मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या ठिकाणी प्राथमिक उपचार केंद्र, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी, रुग्णवाहिका, अग्निशमन यंत्रणा आणि आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी मोकळे मार्ग उपलब्ध असणे आवश्यक असते. मात्र, या घटनेच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन वैद्यकीय आणि अग्निसुरक्षा व्यवस्था प्रत्यक्षात किंतपत उपलब्ध होती, याचीही पडताळणी होणे गरजेचे आहे.

**गर्दी नियंत्रण आणि गोविंदा पथकांची सुरक्षा**

दहीहंडी फोडण्यासाठी मानवी मनोरे उभारताना सहभागींच्या सुरक्षेसाठी आवश्यक नियमांचे पालन झाले का, हेल्मेटसारखी सुरक्षा साधने वापरण्यात आली का, तसेच घटनास्थळी पुरेशा संख्येने प्रशिक्षित स्वयंसेवक आणि सुरक्षा कर्मचारी तैनात होते का, याचीही तपासणी आवश्यक आहे. याशिवाय रस्त्यावर होणारी गर्दी, वाहनांची ये-जा, प्रेक्षकांसाठी सुरक्षित अंतर, महिला व मुलांसाठी स्वतंत्र सुरक्षित जागा आणि आपत्कालीन मार्ग मोकळा ठेवण्यात आला होता का, हे प्रश्नही महत्त्वाचे ठरत आहेत.

## चंद्रपूरच्या अधीरने देशात पटकावला पाचवा क्रमांक; आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

दि.०६, चंद्रपूर : चंद्रपूरचा अवघ्या ४.९ वर्षांचा अधीर अमृता सुबोध जुन्नावार याने स्केटिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत अंडर-६ वयोगट मध्ये देशात पाचवा क्रमांक पटकावला आहे. दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी पणजी, गोवा येथे आयोजित आरआरएसएफआय राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंग स्पर्धेत अधीरने उत्कृष्ट कामगिरी करत हे यश संपादन केले.

राष्ट्रीय स्तरावरील या दमदार कामगिरीच्या जोरावर अधीरची श्रीलंका येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अवघ्या ४.९ वर्षांच्या वयात राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवत अधीरने चंद्रपूरचे नाव देशाच्या स्केटिंग क्षेत्रात उज्वल केले आहे.

विशेष म्हणजे, हे अधीरचे स्केटिंग क्षेत्रातील पहिलेच यश नसून, यापूर्वीही त्याने विविध जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत पदके व पुरस्कार मिळवले आहेत. अत्यंत कमी वयात स्पर्धात्मक स्केटिंगमध्ये सातत्याने उत्तम कामगिरी करत अधीरने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या प्रत्येक स्पर्धेतील कामगिरीत सातत्याने सुधारणा होत असून, राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे पाचवे स्थान त्याच्या मेहनतीला मिळालेली मोठी दाद मानली जात आहे. अधीरने अत्यंत कमी वयात मिळवलेले हे यश सातत्यपूर्ण सराव,



जिद्द, मेहनत आणि क्रीडा क्षेत्रातील समर्पणाचे फलित आहे. त्याच्या या कामगिरीमुळे चंद्रपूरच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, कुटुंबीय, क्रीडाप्रेमी, मित्रपरिवार तसेच चंद्रपूरकरांकडून अधीरवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अधीरच्या या यशामागे त्याचे प्रशिक्षक विनोद निखाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाखाली अधीरने प्रशिक्षण घेत राष्ट्रीय स्तरावर ही उल्लेखनीय झेप घेतली आहे. अधीरच्या प्रतिभेला योग्य दिशा देत त्याच्या सरावावर आणि तंत्रावर प्रशिक्षक विनोद निखाडे सातत्याने मेहनत घेत आहेत.

आता श्रीलंकेत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अधीर सज्ज झाला असून, या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही तो आपल्या कामगिरीने चंद्रपूर आणि भारताचे नाव उज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चिचोली येथील टॉवर लाईनजवळ जुगार अड्ड्यावर धाड !

### १ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त ; ५ आरोपींना रंगेहाथ अटक, १ फरार

**अक्षराज : दिवाकर घेर**

दि.०६, नागपूर : खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिचोली येथे टॉवर लाईनजवळ सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर खापरखेडा पोलिसांनी ६ सप्टेंबर रविवारला दुपारच्या सुमारास धाड टाकून पाच आरोपींना रंगेहाथ अटक केली. सदर घटनेत तीन दुचाकी, मोबाईल फोन व रोख रकमेसह एकूण १ लाख ३६ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून एक आरोपी पसार झाला आहे.

साहिल जाकिर दुधकनोज(३०), राहुल दादाराव निकोसे(४४), धर्मेंद्र उर्फ धर्मा अतिश्वर डोंगरे(३६), हसन खलील शेख(३२),रोहित नितलाल तुरकर (२७) सर्व रा चिचोली वार्ड क्रमांक १ अशी



अटकेतील आरोपींची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार ६ सप्टेंबर रविवारला खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करीत होते. यावेळी चिचोली येथे टॉवर लाईनजवळ मैदानात काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली माहितीच्या आधारावरून धाड टाकली असता नगदी ६ हजार ११० रुपये, तीन दुचाक्या, ५ मोबाईल, ५२ तासपत्ते असा एकूण २ लाख ३६ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळावरून जप्त केला.कारवाईदरम्यान आरोपी सचिन घोडेस्वार हा घटनास्थळावरून पसार झाला असून पोलीस शोध घेत आहेत

पोलीस शिपाई बादल गिरी यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पोळीच्या पावन पर्वावर खापरखेडा पोलिसांनी धडक कार्यवाही सुरू केल्यामुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव, पोहवा संदीप सगने, बादल गिरी, आशिष मेश्राम, शेखर वानखेडे, आशिष कापसे यांच्या पथकाने पार पाडली.

अक्षराज





## आशियाई पाण्याचा प्रश्न

नेपाळमधील महाप्रलयाने पुन्हा एकदा हिमालय आणि तिबेटच्या पठाराकडे जगाचे लक्ष वेधले आहे. तिबेटच्या सीमजवळील हिमनदी आणि बर्फ-खडकांच्या प्रचंड हालचालीमुळे निर्माण झालेल्या पाण्याच्या लोंढ्याने भोटेकोशी आणि त्रिशूली नदीखोऱ्यात हाहाकार माजवला. प्राथमिक वैज्ञानिक आकलनानुसार ही घटना हिमनदी कोसळणे, नदीला तात्पुरता अडथळा निर्माण होणे आणि त्यानंतर तो अडथळा फुटून प्रचंड पाणी व गाळ खाली येणे अशा साखळीमुळे घडली. ही घटना चीनने जाणीवपूर्वक घडवून आणली, असा निष्कर्ष काढण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु त्याने एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर आणला आहे – आशियाच्या पाण्याचे भवितव्य नेमके कुठे ठरते? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला तिबेटच्या पठारावर मिळते.

तिबेट हा आशियाच्या जलव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच हिंदुकुश, हिमालय आणि तिबेटच्या पठाराला 'तिसरा ध्रुव' आणि तिबेटच्या पठाराला 'आशियाचे जलस्तंभ' म्हटले जाते. आर्क्टिक आणि अंटार्क्टिकनंतर पृथ्वीवरील सर्वांत महत्त्वाच्या बर्फसाठ्यांपैकी एक असलेला हा प्रदेश आशियातील असंख्य नद्यांना पाणी पुरवतो. हवामान बदलामुळे या प्रदेशातील हिमनद्या, हिमसाठे आणि जलव्यवस्था वेगाने बदलत आहेत. अलीकडील संशोधनानुसार आशियाच्या या 'वॉटर टॉवर'वर हवामान बदलाबरोबरच जलविद्युत प्रकल्पांचा वाढता विस्तारही परिणाम करत आहे. या प्रदेशातून उगम पावणाऱ्या नदीप्रणालींवर अवलंबून असलेल्या कोट्यवधी लोकांच्या जलसुरक्षेसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. तिबेटचे पठार सुमारे चार हजार मीटरपेक्षा अधिक उंचीवर पसरलेला विस्तीर्ण भूभाग आहे. सिंधू, सतलज, ब्रह्मपुत्रा, कर्णाली, कोसी, गंडक, मेकाँग, सालवीन अशा अनेक महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय नद्यांच्या जलप्रणालीशी त्याचा थेट संबंध आहे. यांगत्से आणि पीत नदीसारख्या चीनच्या प्रमुख नद्यांचाही उगम या उच्च पर्वतीय जलव्यवस्थेशी संबंधित आहे. म्हणजेच तिबेटचा प्रश्न केवळ चीनचा अंतर्गत प्रश्न राहिलेला नाही. तिबेटच्या जलव्यवस्थेचा परिणाम भारत, नेपाळ, भूतान, बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार, थायलंड, लाओस, कंबोडिया आणि व्हिएतनामपर्यंत पोहोचतो. यातील भारतासाठी सर्वांत महत्त्वाची नदी म्हणजे ब्रह्मपुत्रा. तिबेटमध्ये यारलुंग त्सांगपो या नावाने वाहणारी ही नदी अरुणाचल प्रदेशात प्रवेश करते आणि पुढे आसाममधून वाहत बांगलादेशात जाते. त्यामुळे तिच्या उगमक्षेत्रातील कोणताही मोठा भौगोलिक, पर्यावरणीय किंवा मानवी हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. याच ठिकाणी जलसुरक्षा आणि सामरिक सुरक्षा एकमेकांशी जोडल्या जातात. चीनने तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणावर जलविद्युत प्रकल्प उभारले आहेत आणि आणखी प्रकल्पांची योजना आहे. वरच्या प्रवाहावर असलेल्या देशाकडे नदीच्या प्रवाहाचे नियमन करण्याची क्षमता असते. त्यामुळे खालच्या देशांसाठी प्रश्न केवळ पाण्याच्या एकूण उपलब्धतेचा नसतो; तर पाणी कधी, किती आणि कोणत्या पद्धतीने उपलब्ध होते, हा देखील तितकाच महत्त्वाचा असतो. याचा अर्थ असा नाही की चीन जाणीवपूर्वक भारतात पूर किंवा दुष्काळ निर्माण करेलच. परंतु एका देशाकडे नदीच्या उगमक्षेत्रावर आणि दुसऱ्या देशाकडे तिच्या खालच्या प्रवाहावर अवलंबित्व अशी विषम भौगोलिक परिस्थिती निर्माण झाली की त्यातून सामरिक जोखीम निर्माण होते. उदाहरणार्थ, पावसाळ्यात धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडले गेले किंवा जलाशयांचे व्यवस्थापन पुरेशा समन्वयाशिवाय झाले तर अरुणाचल प्रदेश आणि आसामसारख्या भागांमध्ये पूरस्थिती गंभीर होऊ शकते. उलट, कोरड्या हंगामात पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात रोखला किंवा वळवला गेला तर त्याचे परिणाम पाणी उपलब्धतेवर होऊ शकतात. भारतासाठी हा प्रश्न विशेषतः संवेदनशील आहे. अरुणाचल प्रदेश आणि आसाममधील ब्रह्मपुत्रेची परिसंस्था, शेती, मानवी वस्ती आणि अर्थव्यवस्था नदीच्या नैसर्गिक प्रवाहाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे भारताने ब्रह्मपुत्रेसह सर्व सीमापार नद्यांबाबत उपग्रह निरीक्षण, जलमाहितीचे संकलन, पूरपूर्व इशारा प्रणाली आणि आंतरराष्ट्रीय जलमाहितीची देवाणघेवाण अधिक सक्षम करण्याची गरज आहे. ,या प्रश्नाकडे केवळ चीनच्या दृष्टिकोनातून पाहणेही योग्य ठरणार नाही. तिबेट आणि हिमालय स्वतःच हवामान बदलाच्या प्रचंड दबावाखाली आहेत. वाढते तापमान, हिमनद्यांचे आकुंचन, हिमसाठ्यातील बदल, वितळणारे पर्माफ्रॉस्ट, अस्थिर पर्वतीय उतार आणि हिमनदीजन्य सरोवरांचा वाढता धोका यामुळे अचानक पूर, भूस्खलन आणि हिमस्खलनाच्या घटना अधिक गंभीर होऊ शकतात. नेपाळमधील दुर्घटना याचे ताजे उदाहरण आहे. अशा घटना एक महत्त्वाचा धडा देतात. हिमालयातील नदी ही केवळ पाण्याचा प्रवाह नाही; ती एका अतिशय संवेदनशील आणि बदलत्या परिसंस्थेचा भाग आहे. त्यामुळे तिबेटच्या पठाराकडे केवळ चीनच्या सार्वभौमत्वाच्या किंवा सीमवादाच्या चष्म्यातून पाहणे पुरेसे नाही. या नद्यांनी हजारो वर्षे मानवी संस्कृती निर्माण केल्या. सिंधू खोऱ्यातील प्राचीन संस्कृती असो किंवा चीनमधील पीत नदीच्या खोऱ्यात विकसित झालेल्या संस्कृती – मानवी सभ्यतेचा विकास नदीकाठाशीच झाला. आज मात्र याच नद्यांवर धरणे, जलविद्युत प्रकल्प, प्रदूषण, नदीपात्रातील अतिक्रमणे, भूजलाचा अतिरेक आणि हवामान बदलाचा संयुक्त दबाव आहे. आशियाची लोकसंख्या जगातील सर्वाधिक आहे. शेती, अन्नसुरक्षा, उद्योग, ऊर्जा, मानवी आरोग्य आणि उपजीविका या सर्वांचा आधार पाण्यावर आहे. त्यामुळे आशियात पाण्यावरील संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.


– डॉ. सुमंत पांडे

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई थोडी केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती.

मात्र, आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्यांनी पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतः च्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत.

जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमाजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे



इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे.


इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. उमाजींची माहिती देणाऱ्यास १० हजार रुपये आणि चारशे बिघा जमीन मिळेल असे बक्षिस ठेवले. इंग्रजांची ही नीती कामी आली. एका महिलेचे अपहरण केले म्हणून काळोजी नाईक याचे हात उमाजींनी कलम केले होते तो इंग्रजांना जाऊन मिळाला. उमाजींच्या जवळचा नाना चव्हाण हा देखील इंग्रजांना जाऊन मिळाला. या दोघांनी फितुरी करून उमाजींची माहिती इंग्रजांना दिली. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उत्रोली गावात उमाजींना पकडण्यात आले.

उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शेतकऱ्यांचे पिक करपत आहे आणि बाकीचे त्यांच्याच धुंदीत

आपण सगळेच जाणतो की इथली संपूर्ण व्यवस्था शेतकरी बांधवांच्या विरोधात कार्यान्वित झाली आहे. शेतकऱ्यांचे अनेकजण वैरी आहेत.यात पावसाची भर पडली आहे. कोरडा दुष्काळ शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजला आहे.अंगणातल्या झाडांची फळं फुलं कोणी तोडून नेली की आपल्या रागाचा पारा चढतो,आपण फणफणतो आणि शिव्याशाप देतो. अंगणात उभे केलेल्या वाहनांच्या सीटवर,काचावर,मरगाडवर कोणी रेषा ओढल्या तर आपण ओरडतो,खेकसतो.परंतु सध्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पिकांची पावसा अभावी राखरांगोळी होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक करपत आहे.हे पाहून समस्त शेतकरी बांधवांच्या मनाला किती वेदना



होत असतील याची कल्पना सुद्धा करता येत नाही.एकतर महागडे बी बियाणे खरेदी करून ते पावसाच्या बेभरवशावर काळ्या मातीत पेरायला हिंमत लागते. ती हिंमत शेतकऱ्यांकडे आहे म्हणून दरवर्षी ते शेतात हिंमतीने पेरणी करतात.धनधान्य पिकवतात आणि सर्व जगाची भूक भागवतात.म्हणून तर आपण शेतकऱ्यांना जगाचा पोशिंदा म्हणतो.परंतु,यावर्षी पावसाने जून महिन्या पासून खेळ खंडोबा सुरू केला आहे.

जून महिन्यात पेरणीयोग्य पाऊस पडला नाही.थोडाफार पाऊस पडला आणि तेवढ्याच ओलीच्या भरवशावर शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली.काही शेतकऱ्यांना दरवर्षी दुबार पेरणी करावी लागते.यावर्षीही बहुतांश शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट सोसावे लागले. पेरणीनंतर काही ठिकाणी भाग बदलत थोडाफार पाऊस पडला.काही भागात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे पिके जोमात होती.शेतकऱ्यांनी कोळपणी व खुरपणी वेळेत केली.त्यानंतर मात्र दुष्ट पावसाने चांगलीच दडी मारली.ऐन उमेदीत पिकांना पावसाची नितांत गरज असताना पाऊस गायब झाला.पावसा अभावी शेतातील पिके जळून खाक होत आहेत.हे पाहून कोणाच्याही मनाला वेदना होतील अशी भयानक अवस्था त्या पिकांची झाली आहे. स्वत:च्या शेतातील स्वतःच्या हाताने पेरणी केलेल्या पिकांना करपताना पाहून शेतकऱ्यांच्या जीवाची किती घालमेल होत असेल.मनाला कितीतरी वेदना होत असतील.हृदयाचे तुकडे तुकडे होत असतील!

रस्त्याच्या कडेने येता जाता शेतातील सुकून गेलेल्या,करपलेल्या पिकांना पाहिले की मन बधीर होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील पिके जळून जात असल्याचे पाहून आपण सगळ्यांनी शेतकरी बांधवांच्या दुःखात सहभागी होणे गरजेचे आहे.त्यांना धीर देणे गरजेचे आहे. निसर्ग कोपला म्हणून शेतकऱ्यांना अंतर न देता आपण सगळ्यांनी मिळून शेतकरी बांधवांच्या जवळ जाऊन त्यांना हिंमत हारू नका म्हणून धीर दिला पाहिजे.मायबाप सरकारने सर्व शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक आधार देण्याचे अभिवचन दिले पाहिजे.कोरडा दुष्काळ हा फार भयानक असतो.अन्नधान्याचा प्रश्न बिकट होतो. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. रानावनातील पशुपक्ष्यांची दयनीय अवस्था होऊन जाते.कोरडा दुष्काळ कोणालाही न परवडणारा असतो.ओला दुष्काळ सुखदायक असतो पण कोराडा दुष्काळ जीवघेणा ठरतो.जर आगामी काळात पुरेसा पाऊस नाही पडला तर मग आजच्या पेक्षा जास्त फार दयनीय अवस्था होणार आहे.अनधान्याची तरतूद कशीतरी होईल पण प्यायला पाणी मिळणार नाही.पाण्याअभावी हे जग ठप्प होऊन जाईल.शेतकऱ्यांच्या घरातील वातावरण उदास दुःखी कष्टी झालेले असेल.अशावेळी आपण सगळ्यांनी आपल्या धुंदीत जगणे सोडून दिले पाहिजे.एकमेकांशी सुसंवाद साधला पाहिजे.सगळ्यांनी मिळून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.कोरड्या दुष्काळाचा मुकाबला आपण सगळ्यांनी मिळून हिमतीने करणे काळाची गरज आहे. पावसा अभावी शेतकऱ्यांचे पिक जळत असताना आपण त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.शेतकरी फार मोठ्या मनाचे असतात.आपल्या शेतातील धान्य,भाजीपाला झुकते माप देऊन कमी दरात विकतात. शेताजवळून जाणारे वाटसरू शेतकऱ्यांच्या पिकावर,भाजीपाल्यावर,फळांवर हात साफ करतात.शेतकऱ्यांचा शेतीमाल ग्राहकांना फुकटात मिळावा वाटतो अशी मानसिकता वाढली आहे.तरीही शेतकरी त्याबद्दल काही म्हणत नाहीत.

अशा दिलदार मनाच्या शेतकऱ्यांना आपण सगळ्यांनी धीर देऊया.कोरड्या दुष्काळाचा मुकाबला करू या.पिण्याचे पाणी जपून वापरू या.सगळे पाणी फक्त आपल्याला मिळावे ही मानसिकता सोडून देऊया.पुढील काळात चांगला पाऊस पडावा आणि पुढच्या वर्षी मुसळधार पाऊस पडावा असे वाटत असेल तर शक्य असेल तेथे आणि शक्य होतील तेवढे जास्तीत जास्त झाडे आपण सगळ्यांनी मिळून लावणे काळाची गरज असणार आहे.केवळ फोटो पुरते वृक्षारोपण करुन चालणार नाही.लावलेल्या झाडांना वेळोवेळी पाणी घालू या,त्या झाडांचे संवर्धन व संरक्षण करूया. ज्यामुळे भविष्यात कोरड्या दुष्काळाचे संकट पुन्हा ओढवणार नाही.फावला वेळ फालतू गोष्टींवर वाया घालवण्यापेक्षा आपण आपला फावला वेळ झाडे लावण्यावर व झाडे जगवण्यावर खर्ची केला पाहिजे.तेव्हा झाडे लावूया,झाडे जगवू या आणि स्वतःला जीवंत ठेवूया.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

## बुलंद

जाणवे जन आक्रोश
उठता आवाज बुलंद
रे बहि-याकानांपर्यंत
पोचाया हवा आक्रंद

तापल्यामातीवर थेंब
सुटे मन मोहक मृद्गंध
जन सेवेत कार्य मग्न
लाभे आत्मीय आनंद

जन सेवा कठीण व्रत
केवळ नसतो हा छंद
अत्याचारां नुरे सिमा
अन्यायउसळे अंदाधुंद

कुकृत्ये करणारेस्वतंत्र
भासे गोळीबार बे धुंद
असत्यांस भेटे अफवा
जोडे बादरायण संबंध

नियम कायदे न अडवे
विमुक्तफिरतात समंध
कृष्ण युक्ती येई कामी
सहजी न मरे जरासंध

उघडेलं आगळा रस्ता
सर्वमार्ग जरी होई बंद
सुसाटल्या वादळामधे
ज्योतउजळत राहेमंद


**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# दहीहंडीच्या कार्यक्रमांत डीजेचा दणदणाट !

यंदाचा गणेशोत्सव वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत आहे. गणेशोत्सव मिरवणुकीत वाजवला जाणारा डीजे हे त्यातीलच एक कारण. सध्या पुण्यात हा विषय चांगलाच गाजतो आहे. डीजे आणि मिरवणुकांतील ध्वनी प्रदूषण याबाबत विद्यानंद बापट यांची मते न पटल्याने त्यांना झालेल्या मारहाणीनंतर हा विषय अधिक चवीने चर्चिला जाऊ लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी डीजेचे स्तोम लोकसहभागातून कमी करण्याचे आश्वासन देऊन सावध भूमिका घेतली आहे. गणेशोत्सवात डीजे वाजवावा कि वाजवू नये हा मुद्दा अद्याप कोणालाही स्पष्ट झाला नसला तरी नुकत्याच पार पडलेल्या गोपाळकाला उत्सवात मात्र मुंबई ठाण्यासह पुण्यातही डीजेचा दणदणाट पाहायला मिळाला. कालपरत्वे गोपाळकाला हा उत्सव सुद्धा नवरात्री उत्सवाप्रमांणे राजकीय मंडळी आणि उद्योगपती यांनी हायजॅक केला आहे. त्यामुळे या ठिकाणी उत्सवातील धार्मिकता केवळ नावाला दिसून आली. मुंबई ठाण्यात अनेक ठिकाणी लाखोंची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या पाहायला मिळाल्या. सकाळपासून रात्रीपर्यंत सुरु असलेल्या या कार्यक्रमांत दिवसभरात अनेक सेलिब्रिटी आणि मंत्री संत्रींनीं भेटी दिल्या. उपस्थित लोकांमधील आणि थर लावण्यासाठी येणाऱ्या गोपाळकाला मंडळांतील तरुणांचा उत्साह टिकून राहावा यासाठी जवळपास सर्वच ठिकाणी मोठ्या आवाजातील डीजेंची व्यवस्था करण्यात आली होती. त्यांचा दणदणाट दूरवर ऐकू येत होता. अशा ठिकाणी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी पक्षातील अनेक मंत्री महोदयांनी हजेरी लावली मात्र कोणीही डीजे बाबत साधे अवाक्षर काढले नाही. त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण देणारा, गर्भवती स्त्रिया, लहान मुले आणि वयोवृद्ध यांच्या जीवावर बेतणाऱ्या डीजेला सत्ताधारी मंडळींसह मुख्यमंत्र्यांची मूकसंमती आहे का असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडला आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२




# धक्कादायक! कामोठ्यात स्कूल बस चालकाकडून साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचाराचा आरोप; आरोपीला अटक

## घटनेमुळे पालकांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०६, पनवेल (नवी मुंबई) :** कामोठे परिसरात शाळकरी चिमुरडीच्या सुरक्षेला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे. शाळेतून विद्यार्थ्यांना घरी सोडण्याची जबाबदारी असलेल्या ३० वर्षीय स्कूल बस चालकाने साडेतीन वर्षांच्या चिमुरडीसोबत अश्लील लैंगिक कृत्य केल्याचा आरोप असून, या प्रकरणी कामोठे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ०२ सप्टेंबर रोजी शाळा सुटल्यानंतर चिमुरडी घरी परतल्यानंतर तिने पालकांना स्कूल बस चालकाबाबत संशयास्पद प्रकार घडल्याचे सांगितले.मुलीने संबंधित चालकाला पकडण्याची मागणी ही आजीकडे केली. त्यानंतर पालकांनी मुलीची तपासणी केली असता त्यांना धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच पालकांनी शाळा प्रशासनाशी संपर्क साधला. शाळेच्या मदतीने या प्रकरणाची तक्रारकामोठे पोलीस ठाण्यातकरण्यात आली. तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांनी संशयित स्कूल बस चालकाला ३ सप्टेंबर रोजी ताब्यात घेत त्याच्याविरोधात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

या घटनेमुळे परिसरातील पालकांमध्ये मोठी चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची, स्कूल बस चालक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना आवश्यक पडताळणी केली जाते का आणि विद्यार्थ्यांच्या प्रवासादरम्यान पुरेशी सुरक्षा व्यवस्था आहे का, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना सातत्याने समोर येत असल्यानेशाळा प्रशासन, परिवहन व्यवस्था आणि पालकांनी बालसुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरजनिर्माण झाली आहे. स्कूल बसमध्ये चालकासोबत आवश्यक सुरक्षा कर्मचारी आहेत का, चालकांची पार्श्वभूमी तपासली जाते का आणि विद्यार्थ्यांच्या हालचालींवर योग्य देखरेख ठेवली जाते का, याची काटेकोर तपासणी करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.

कामोठ्यातील या घटनेनंतर शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये दोषींवर कठोर कारवाई करण्यासोबतच भविष्यात अशा घटना घडू नयेत. यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# रुद्रेश्वर महादेव मंदिराचा महिमा व इतिहास !

## अजिंठा लेण्यांच्या काळातील कोरीव शिल्पकलेचे अप्रतिम उदाहरण



अजिंठा पर्वतरांगेत, लेण्यांच्या पाठीमागील डोंगरामध्ये वसलेले स्वयंभू रुद्रेश्वर महादेव मंदिर हे खऱ्या अर्थाने शिल्पकलेचे वैभव आहे. संभाजीनगरपासून १२० कि.मी. आणि जळगावपासून ६० कि.मी. अंतरावर असलेले हे मंदिर अजिंठा लेण्यांच्या काळातच कोरले गेले असावे, असा अंदाज व्यक्त केला जातो. सोयगाव तालुक्यातील गलवाडा गावापासून सात किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे.

**गाई-गुराख्यांनी लावला शोध :** शेकडो वर्षांपूर्वी गाई-म्हशी चारणाऱ्या गुराख्यांनी या मंदिराचा शोध लावल्याचे सांगितले जाते. मंदिराच्या माथ्यावरून दोनशे फूट उंचीवरून कोसळणारा धबधबा आणि समोरील प्रचंड तीर्थकुंड हे भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकला : मंदिरात प्रवेश करताच सहा फूट उंचीची गणेशमूर्ती, रिद्धी-सिद्धीच्या मूर्ती, कालभैरव व नरसिंहाची कोरीव मूर्ती दिसतात. पश्चिमेला नंदीची भव्य मूर्ती असून त्याच्या उत्तरेस स्वयंभू रुद्रेश्वर शिवलिंग आहे. मंदिरातील वैशिष्ट्य म्हणजे येथे वर्षभर एकसमान तापमान राहते.

**दिव्य अनुभव :** या मंदिरातील दुर्मिळ घटना म्हणजे दररोज एकदा शिवलिंगावर सूर्यकिरणांचा अभिषेक होतो. संध्याकाळच्या वेळी डोंगरआडून सूर्यप्रकाश नेमका शिवलिंगावर पडतो. हे दृश्य पाहण्यासाठी हजारो भक्त गर्दी करतात.

श्रावण मासात आणि महाशिवरात्रीला लाखो भाविक दर्शनासाठी येथे येतात. भक्तांच्या अनुभवांनुसार ` दाट जंगल, अंधार, हिंस्र प्राणी असूनही एकाही भक्ताला कधीही इजा झालेली नाही. जो एकनिष्ठ श्रद्धेने दर्शनास येतो, त्याचे रक्षण रुद्रेश्वर महाराज स्वतः करतात.

**श्रद्धा आणि महिमा :** धबधब्याखाली स्नान केल्यास संततीप्राप्ती होते, अशी श्रद्धा आजही अनेक जोडपी मानतात. येथे रुद्राभिषेक, जलाभिषेक करून केलेल्या मनोभावे प्रार्थनांनी भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असा अनुभव आहे.

**सुविधांचा अभाव :** इतक्या वैभवशाली वारशाच्या ठिकाणी मात्र आजही रस्ते, सभामंडप, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा नाहीत. इतकं सुंदर मंदिर (कोरीव लेणी) असून शासनाकडून कुठलाही विकास झाला नाही, हे खेदजनक आहे. रुद्रेश्वर मंदिरासाठी निधी मंजूर व्हावा, अशी भक्तांची प्रार्थना आहे.

**- पुनम परदेशी**
**सोयगाव (छ.संभाजीनगर)**

# नांदेड आगाराचा बसचा मोठा अपघात टळला !



**अक्षराज : जफर शेख**

**दि.०६, बोरी :** नांदेड आगाराची बस क्रमांक एम. एच. ०६ एस ८७३५ ही जिंतूरहून नांदेडकडे प्रवासी घेऊन जात असताना रविवारी एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. प्रवासादरम्यान महिला वाहक आणि एका प्रवाशामध्ये वाद झाल्याची माहिती मिळत असून, संबंधित वाहकाने चालकाला बस पोलीस ठाण्यात घेऊन जाण्याची विनंती केली होती.

दरम्यान, जिंतूर-परभणी रोडवर बोरी या ठिकाणी बसला यू-टर्न घेण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने चालकाने कौशल्याने बस कौसडी रोडच्या दिशेने नेण्याचा निर्णय घेतला. बस सुमारे २०० मीटर पुढे गेल्यानंतर पुन्हा यू-टर्न घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

मात्र, बस रिव्हर्स घेत असतानाच अचानक बसचा क्लच तुटला. त्यामुळे चालकाचे बसवरील नियंत्रण सुटून बस थेट रिव्हर्समध्ये मागील बाजूस जाऊ लागली. बसच्या मागील बाजूस नाला असून, त्याच परिसरात ३३ केव्ही क्षमतेची विद्युत डीपी असल्याने परिस्थिती अत्यंत धोकादायक बनली होती.

सुदैवाने बस रिव्हर्स जात असताना डीपीच्या अगदी जवळ येऊन थांबली आणि मोठा अनर्थ टळला. बस आणखी काही अंतर मागे गेली असती तर नाल्यात जाण्याबरोबरच विद्युत डीपीला धडकण्याची शक्यता होती. त्यामुळे काही क्षणांसाठी प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता.

या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुखापत झाली नाही. बसमधील सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती आहे. चालकाच्या प्रसंगावधानामुळे तसेच सुदैवाने बस योग्य ठिकाणी थांबल्याने मोठी दुर्घटना टळली.

या घटनेमुळे बसच्या तांत्रिक स्थितीबाबत तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहे.

# चंद्रपुरात 'सन्मान कर्तृत्वाचा' सोहळा उत्साहात

## माजी आमदार व्ही.यू.डायगव्हाणे, प्राचार्य डॉ.तायवाडे यांचा जीवनगौरव पुरस्काराने सपत्निक सन्मान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाउंडेशन तसेच गोविंद मैना फाउंडेशन, चंद्रपूर यांच्या वतीने 'सन्मान कर्तृत्वाचा - उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे रविवारी सकाळी ११ वाजता झालेल्या या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले होते. आमदार ॲड. अभिजित वंजारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह आजचे सत्कारमूर्ती, शिक्षण क्षेत्रात आपले संपूर्ण आयुष्य कार्यासाठी समर्पित करणारे माजी शिक्षक आमदार व्ही.यू.डायगव्हाणे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ.बबनराव तायवाडे, प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे, पुष्पाताई डायगव्हाणे, विमाशी संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, गोविंद मैना फाउंडेशनच्या अध्यक्ष सीमा अडबाले, गोविंदराव वंजारी फाउंडेशनच्या कोषाध्यक्षा स्मिता वंजारी, शिवाजी ढुमणे तसेच तिन्ही जिल्ह्यांतील विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यात माजी आमदार व्ही.यू.डायगव्हाणे, प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे यांना जीवनगौरव पुरस्काराने सपत्नीक सन्मानित करण्यात आले. यानंतर चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यातील उत्कृष्ट शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक अशा एकूण १०० सत्कारमूर्तींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शिक्षकांच्या कर्तृत्वाला समाजासमोर अधोरेखित करणारा हा सोहळा शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विशेष ठरला. प्रास्ताविक अरविंद देशमुख यांनी, कार्यक्रमाचे संचालन सुनील शेरकी, प्रज्ञा बारेकर, रूपाली मुंगल यांनीतर आभारप्रदर्शन दीपक धोपटे यांनी केले.

### कर्तृत्वाची समाजाने घेतलेली दखल - आ.सुधाकर अडबाले

आज आपण 'आदर्श शिक्षक' नव्हे, तर 'उत्कृष्ट शिक्षक' या संकल्पनेचा सन्मान करत आहोत. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक अशा सर्व घटकांचा आपण या ठिकाणी सन्मान केला आहे. हा पुरस्कार देण्यासाठी आम्ही कोणतीही निवड समिती स्थापन केलेली नाही. कोणाकडून प्रस्ताव मागवले नाहीत. बायोडाटा मागवला नाही. दहा प्रस्तावांमधून एकाची निवड करण्याची पद्धतही आम्ही स्वीकारलेली नाही. कारण प्रस्ताव मागवून केलेल्या निवडीमध्ये कोणीतरी निवडले जाते आणि कोणीतरी नाराज होते. आम्ही कोणाचेही प्रस्ताव मागवलेले नाहीत. आमच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण क्षेत्रात आपण केलेल्या कामाचे मूल्यमापन केले आणि त्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींची निवड केली. म्हणूनच आजच्या या सन्मानाबद्दल कोणाला ही नाराज होण्याचे कारण नाही.

हा पुरस्कार म्हणजे केवळ एक सन्मानपत्र किंवा पुरस्कार नाही; हा आपल्या कर्तृत्वाची समाजाने घेतलेली दखल आहे. कारण शिक्षकांच्या प्रश्नांसाठी, शिक्षण क्षेत्राच्या भविष्यासाठी आणि मराठी माध्यमाच्या शाळांच्या अस्तित्वासाठी आपला आवाज सभागृहात बुलंद असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या आणि शिक्षण क्षेत्राच्या प्रश्नांसाठी सभागृहात ठामपणे उभे राहणारा असा आमदार आपल्याला आवश्यक आहे, असे आव्हान देखील आ.सुधाकर अडबाले यांनी केले.

### 'शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा घटक' : ॲड.अभिजित वंजारी

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. अभिजित वंजारी म्हणाले की, विदर्भामध्ये शिक्षण क्षेत्रात किंवा विविध संघटनांच्या माध्यमातून सातत्याने काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून योग्य शिक्षकांची शिफारस झाली पाहिजे आणि संबंधित शिक्षकाच्या कर्तृत्वाची खात्री झाल्यानंतरच त्याचा सन्मान झाला पाहिजे. ही भूमिका संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनामागे होती आणि म्हणूनच हा कार्यक्रम वेगळा व विशेष ठरतो, असे त्यांनी सांगितले.

शिक्षक विद्यार्थ्यांच्या कोऱ्या पाटीवर ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे संस्कार करून त्यांना घडवत असतो. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून समाज घडविणाऱ्या कर्तृत्वाचा सन्मान आहे, असे त्यांनी नमूद केले.

### 'पुरस्कार मिळवणे नव्हे, कर्तृत्व टिकवणे महत्त्वाचे' : व्ही.यू. डायगव्हाणे

सत्काराला उत्तर देताना माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे म्हणाले, आपण आज उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रमाणपत्र मिळवले आहे. पण हे प्रमाणपत्र मिळवणे जितके महत्त्वाचे आहे, त्यापेक्षा ते टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. पुरस्कार मिळवणे एकदा शक्य असते; मात्र, आयुष्यभर त्या पुरस्काराला साजेसे कर्तृत्व टिकवणे ही खरी कसोटी असल्याचे त्यांनी सांगितले.

### पुरोगामी विचारातून शिक्षणाचा विस्तार : डॉ. बबनराव तायवाडे

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, पुरोगामी विचारातून गावखेड्यातील गोरगरीब मुलगा असो किंवा मुलगी, तळागाळातील विद्यार्थी-विद्यार्थिनी असोत, त्यांना शिक्षणाच्या सुविधा कशा उपलब्ध करून देता येतील आणि त्यांचे जीवनमान कसे उंचावता येईल, हा एकमेव धागा हृदयात आणि डोळ्यासमोर ठेवून आयुष्यभर काम केले.

# जालंदर ट्युशन क्लासेसमध्ये शिक्षक दिन मोठ्या साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून जालंदर ट्युशन क्लासेस मध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साही आणि आल्हाददायक वातावरणात शिक्षक दिन साजरा केला.



या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे लहानग्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ट्युशन क्लासच्या संचालिका कु. अर्पिता जालंदर यांना दिलेले सुंदर 'सरप्राईज'! शिक्षकांबद्दलचे प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःहून या खास सरप्राईजचे नियोजन केले होते. यावेळी संपूर्ण जालंदर ट्युशन क्लास मध्ये संगीत आणि ढोल-ताशांच्या तालावर नाचत-गाजत मुलांनी शिक्षक दिन धुम धडाक्यात साजरा केला.चिमुकल्यांचा हा उत्साह आणि त्यांचे निस्सीम प्रेम पाहून संचालिका कु. अर्पिता जालंदर या देखील भावुक झाल्या.

कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या महत्त्वाबद्दल मनोगत व्यक्त केले. तसेच शिक्षकांसाठी विविध छोटेखानी खेळ आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले होते. या प्रसंगी बोलताना संचालिका कु.अर्पिता जालंदर म्हणाल्या विद्यार्थ्यांनी दिलेले हे सरप्राईज आणि त्यांचे निर्मळ प्रेम माझ्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. मुलांच्या या गोड आठवणी आणि त्यांचा उत्साह मला भविष्यात आणखी उत्तम मार्गदर्शन करण्यासाठी मोठी ऊर्जा देणारा आहे.

कार्यक्रमाचा शेवट गोडधोड वाटून संचालिका कु.अर्पिता जालंदर यांना शुभेच्छा देऊन करण्यात आला. या सोहळ्यामुळे जालंदर ट्युशन क्लासेसमध्ये एका कौटुंबिक आणि आनंदी वातावरणाची अनुभूती सर्वांना मिळाली.

